दि.17/09/2020

# मू.जे.महाविद्यालय,जळगाव

## सूचना

TYBA / MA / B.SC /M.sc / B.com / M.com / BCA / BBA / BFA Fourth Year/ MFAच्या सन. 2019-20 या वर्षातील तृतीय (TY) तसेच MA / M.sc / M.com / MCJ/ MFA च्या द्वितीय (SY)वर्ष प्रवेशीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी Hybride या पॅटर्न मध्ये प्रवेशीत असतील तसेच ज्या विद्यार्थ्यांचा पी.आर.एन नंबर सोळा अंकी असतील परंतू सदर विद्यार्थ्यांचे फार्म ऑनलाईन भरले जात नसतील अश्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या मार्च -2020 परीक्षा संबधी असलेला विद्यापीठाचा ऑप्शन फॉर्म हा म्यॅनुअली स्वरुपात भरुन महाविद्यालयात दि.19/09/2020 दुपारी 12.00 वाजे पर्यंत जमा करावा.सदर फार्म हा प्रवेश संबधी कामकाज सुरु असलेल्या जुन्या भूगोल विभागातून घ्यावा. सदर चा ऑप्शन फॉर्म विद्यार्थ्यांनी भरुन न दिल्यास विद्यार्थी त्यास स्वत: जबाबदार राहील, त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

MOOLJI JAITHA COLLEGE JALGAON NAAC GRADE 'A' CGPA-3.15 (3rd CYCLE) AUTONOMOUS

(प्रा. सं. ना. भारंबे)
प्राचार्य
मू.जे.महाविद्यालय, जळगांव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/2417/2020 दि.17, सप्टेंबर 2020

प्रति,

1. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.
2. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख.

**विषय** :- अंतिम वर्षाच्या (बॅकलॉगसह) विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अनुषंगाने विकल्प अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत व वेळापत्रकाबाबत.

**संदर्भ** :- 1) विद्यापीठ परिपत्रक क्र.160/2020, दि. 15 मे,2020
2) विद्यापीठ परिपत्रक क्र.201/2020, दि. 10 सप्टेंबर,2020
3) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/7-अ/2364/2020 , दि.12, सप्टेंबर 2020
4) विद्यापीठाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/7-अ/2371/2020 , दि.14, सप्टेंबर 2020

महोदय/महोदया,

1) उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्र क्र.3 चे अवलोकन करावे. संदर्भ क्र.4 च्या पत्रानुसार ऑनलाईन विकल्प (Option) भरण्यास Link दिनांक 17 सप्टेंबर, 2020 पावेतो मुदत देण्यात आली होती. परंतु विद्यार्थ्यांना येत असलेल्या तांत्रिक अडचणींचा विचार करता, **विकल्प (Option) भरण्यास पुन्हा दि.19 सप्टेंबर,2020 पावेतो मुदतवाढ देण्यात येत असून, उन्हाळी 2020 च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांनी** संदर्भीय पत्रातील मुद्दा क्र. (1) व (2) मध्ये नमूद अभ्यासक्रम व त्यासाठीची परीक्षा पध्दती विचारात घेऊन विद्यापीठाच्या http://nmuj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर जाऊन ई-सुविधा Account /Login मध्ये Willingness to Appear in Exam. या Link ला Click करुन विकल्प (Option) सादर करावयाची आहे.

2) सदर Willingness forms फक्त शैक्षणिक वर्ष 2019-2020 मध्ये पदविका,पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षास प्रविष्ठ असलेल्या किंवा अंतिम वर्ष उत्तीर्ण / अनुत्तीर्ण होवून मागील सत्र / वर्षातील असलेल्या विद्यार्थ्यांनीच भरावयाचे आहेत.

3) उपरोक्त संदर्भीय क्र.1 व 2 चे अवलोकन करावे. जे विद्यार्थी अंतिम वर्षात प्रवेशित नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी मागील सत्र / वर्ष करिता उपरोक्त Willingness forms भरु नये. जर विद्यार्थ्यांनी चुकीने भरला असल्यास, ग्राह्य धरला जाणार नाही.

4) उन्हाळी 2020 मध्ये घेण्यात येणारी परीक्षा कोवीड-19 च्या प्रादुर्भावामुळे माहे ऑक्टोबर,2020 मध्ये घेण्यात येत असून, सदर परीक्षांसाठी मुददा क्र.2 मध्ये नमूद केलेल्या विद्यार्थ्यांसाठीच परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे / आलेली आहे.

5) विद्यापीठाचे परिपत्रक 171/2020 , जा.क्र.कबचौउमवि/7अ/कोव्हीड-19/उन्हाळी परीक्षा/1671/2020 दिनांक: 11.06.2020 अन्वये **इ)** 3) मध्ये नमूद केल्याप्रमाणे **अध्यादेश 67 नुसार उन्हाळी 2020 परीक्षेकरीता** Mercy Chance **संधी मान्य करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना ऑक्टोबर/नोव्हेंबर,2020 मध्ये होणाऱ्या परीक्षेत संधी देण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे**.

तसेच याच परिपत्रकातील इ) 4) मध्ये नमूद केल्याप्रमाणे **अध्यादेश 174 नुसार श्रेणी /गुणवत्ता सुधार करण्यासाठी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा उन्हाळी 2020 च्या परीक्षेच्या वेळी न घेता, त्यांनी देण्यात आलेली संधी ग्राह्य धरुन माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर,2020 मध्ये होणाऱ्या परीक्षेत संधी देण्यात येईल**, असे कळविण्यात आलेले आहे.

आता उन्हाळी 2020 (मार्च/एप्रिल,2020) ची परीक्षा घेण्यात येत असल्यामुळे अध्यादेश 67 **नुसार** Mercy Chance **संधी** आणि **अध्यादेश 174 नुसार श्रेणी /गुणवत्ता सुधार** अशा विद्यार्थ्यांची परीक्षा आता ऑक्टोबर,2020 मध्ये होणार नसून, त्यांनी पुढील परीक्षेच्या वेळी संधी देण्यात येणार आहे. अशा विद्यार्थ्यांनी उपरोक्त Willingness forms भरु नये. जर विद्यार्थ्यांनी चुकीने भरला असल्यास, ग्राह्य धरला जाणार नाही.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ